Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

# भारत आणि चीन पाणी विवाद

डॉ. शांताराम बडगुजर,
कुलसचिव,
एस. एन्. डी. टी. महीला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई – २०.

*सारांश* **(Abstract)** :–

*भारत आणि चीन पाणी विवाद हा ब्रम्हपुत्र नदीवरील जलविद्यूत प्रकल्पा संबंधी आहे. दोन्ही राष्ट्रात १९६२ च्या युध्दापासून सिमा विवाद आहे आणि चीन निर्माण करत असलेल्या प्रकल्पामुळे पुन्हा एकदा असुरक्षेची भावना निर्माण झाली आहे. भारतासाठी महत्वाच्या असलेल्या पूर्व राज्याच्या विकासासाठी कुठे तरी चीनच्या या धोरणाचा फटका या भागला बसेल आणि भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीणे या विषयाला गांभीऱ्याने पाहणे महत्वाचे असल्याचे वाटते.*

**Keywords** :– सुरक्षा, विकास, विवाद, जलविद्यूत प्रकल्प, धोरण.

## उद्दिष्टे (Objectives of The Study)

चीनच्या सुरक्षाविषयक धोरणात अनेक बदल निर्माण झाल्याने आणि जलविद्यूत प्रकल्पामुळे भारताच्या सुरक्षा आणि विकासावर परिणाम होईल. याची कारणमिमांसा करणे हा मुख्य उद्देश आहे.

## संशोधन पद्धती (Methodology)

या विषयाच्या विश्लेषणामध्ये विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे. हा लेख मुख्यत: दुय्यम स्त्रोतांवर अवलंबून आहे आणि संशोधनाकरिता निवडलेली संशोधन पद्धत, ही ऐतिहासिक विश्लेषणात्मक पद्धत आहे.

## प्रस्तावणा (Introduction) :–

ब्रह्मपुत्रेच्या पाणी संदर्भात पुन्हा एकदा बरीच चर्चा होत आहे. या चर्चे मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील निर्माण झालेल्या तणावांचा उल्लेख पण दिसतो. ब्रह्मपूत्रेवर चीन निर्माण करत असलेल्या जलविद्युत प्रकल्पामुळे भारतापुढे निर्माण झालेला पाणी प्रश्न आणि सुरक्षा समस्येवर चर्चा करण्याचा प्रयत्न आहे.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

भारताच्या आर्थिक विकासाचा वास्तवादी दृष्टिकोणातून विचार करता आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत पाहता ब्रह्मपूत्रानदीला महत्व प्राप्त झाले आहे याचे मुख्य दोन कारण म्हणजे उत्तर पूर्वे कडील राज्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीणे पण ब्रह्मपूत्रानदीवरील जलविद्यूत प्रकल्पा बाबत भारताला खबरदारी घेणे म्हत्वाचे आहे. दुसरे म्हत्वाचे म्हणजे भारत सरकारच्या आक्ट ईस्ट धोरणावर होणारा परिणाम. पूर्वे कडील देशासोबत चागंले संबंध निर्माण करण्याच्या भारताच्या प्रयत्नाला किंवा विकासाला थांबवीण्याचा प्रयत्न कुटेतरी चीन करताना दिसतो.

- **वर्तमान स्थितीमधील नदी आणि व्याप्ती:**

भारत आणि चीन या दोन्ही देशाच्या बाबतीत महत्वाचे म्हणजे दोन्ही देश हे मोठया चार नदी सोबत जोडूण आहे. मात्र या सर्व नदींची वाटणी ही शेजारी देशासोबत पण आहे. जसे ब्रह्मपूत्रा ही चीन, भारत, भूतान आणि बांगलादेश या चार देशाच्या सिमा क्षेत्रातून वाहते, सिंधू नदी ही चीन, भारत, आणि पाकिस्तान, सतलेज नदी सोबत चीन, भारत, आणि पाकिस्तान, आणि कोसी व घाघारा नदी बरोबर चीन, भारत, आणि नेपाळ या देशासोबत वाटा आहे. जगातील महत्वांच्या नद्यां पैकी एक ब्रह्मपूत्रानदी आहे. ब्रह्मपूत्रा नदीचा उगम हिमालयातील कैलाश सरोवरातून होतो. तिबेट मध्ये ब्रह्मपूत्रेस यार्लुग झँम्बो असे म्हटले जाते. ब्रह्मपूत्रा नदीची व्याप्ती ५,८०,००० स्क्वेअर कि.मी. आहे. ज्यात चीन मध्ये २,७०,९०० स्क्वेअर कि.मी. आहे, बांगलादेश सोबत ३९,१०० स्क्वेअर कि.मी, भूतान मध्ये ३८,४०० स्क्वेअर कि.मी. ब्रह्मपूत्रा नदीची व्याप्ती आहे. आणि भारताच्या संदर्भात विचार करता ब्रह्मपूत्रेची व्याप्ती ही १,९४,४१३ स्क्वेअर कि.मी. आहे. भारतातील राज्यानुसार ब्रह्मपूत्रेच्या खोऱ्यांची व्याप्ती पुढील तक्त्या प्रमाणे दिली आहे.

| राज्य | क्षेत्र ( स्क्वेअर कि.मी.) |
|---|---|
| अरूणाचल प्रदेश | ८१,४२४ |
| टसाम | ७०,६३४ |
| पूर्व बंगाल | १२,५८५ |
| मेघालय | ११,६६७ |
| नागालँड | १०,८०३ |
| सिंक्कीम | ७,३०० |
| एकूण | १,९४,४१३ |

Source:-http://www.india-wris.nrsc.gov.in/wrpinfo/index.php?title=Brahmaputra

- **भारत आणि चीन विवाद :–**

भारत आणि चीन यांच्यात १९६२ च्या युध्दापासून सिमा विवाद आहे. पण पाणी विवाद हा २००० मध्ये निर्माण झाला जेंव्हा अरूणाचल प्रदेशात पूर निर्माण होवून व्यापक नासधूस आणि ३० भारतीयांचा मृत्यू झाले आणि ५०,००० बेघर झाले. भारताने चीनवर आरोप केला की चीन हा जलविद्यूत प्रकल्प आणि पाण्याच्या प्रवाह आणि साठा संबंधी माहिती देत नाही. यामुळे २००२ मध्ये सामंजस्य करार करण्यात आले आणि चीनने पूर परिस्थितीवर पूर्ण माहीती देण्याचे मान्य केले. २००३ मध्ये चीन हा जलविद्यूत प्रकल्प निर्माण करण्यासंबंधी नियोजन करत होता. यावर भारतीय माध्यमे, सुरक्षा तज्ञानी आणि काही आंतरराष्ट्रय निरिक्षकाने चेतावणी दिली की दोन्ही देशात पाणी युध्द होणार यामुळे भारत आणि चीन यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाला. प्रंतप्रधान मनमोहन सिंह यांनी त्यांच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात भारत आणि चीन यांच्यातील पाणी समस्ये संदर्भात ठळक मत माडंले. ब्रह्मपूत्रा नदीच्या पाण्याचा प्रवाहा मोडणार काय? याप्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झाला. यावर २००६ मध्ये चीन सरकारने जलविद्यूत प्रकल्पा निर्मीतीवर खुलासा केला की 'चीन हा नदीच्या पाण्याचा प्रवाहा मोडणार नाही आणि निर्मीती करण्यात येत असलेल्या प्रकल्पाची निर्मीती मध्ये पाणी आडवीण्या संदर्भात नियोजन नाही'. इ.स. २०१३ मध्ये भारत आणि चीन यांच्यात सामंजस्य करार झाला या करार नुसार चीन हा १५ मे ते १५ ऑक्टोंबर पर्यंत ब्रह्मपूत्रा नदी मधील पाण्याच्या पातळी संबंधी माहिती भारताला देणार. परराष्ट्र मंत्रालयानुसार दोन्ही देशातील विषयांतील तज्ज्ञाची समिती नियुक्त करून यासंबंधी माहीतीची देवाण घेवाण केली जाते. मात्र सिंधू नदी संबंधी पाकिस्तान सोबत करार करून पाणी प्रवाह आणि वाटासंबंधी समस्या सोडविण्यात आली त्या नुसार ब्रह्मपूत्रा नदी संबंधी चीन सोबत करार नाही आणि भारत आणि चीन यांच्यात सामंजस्य करार झाला तरी लेखी करार या संदर्भात नसल्याने एक प्रकारची भविष्यातील चीनच्या धोरणाबाबत भीती निर्माण होईल. भविष्याचा वास्तवीक विचार केला आणि चीनने जलविद्युत प्रकल्प अणि धरणाच्या साहयाने २०० बिलीयन्स घन मिटर पाणी पिवळया नदी (चीन) मध्ये सोडले जेनेकरून उत्तर चीन मधील ६०० ते ८०० शहरात पाण्याचा तुटवडा असलेला भरून काढता येईल. विशेष

करून शांगक्षी, हेबेल, बिजींग आणि तैगजीन या महत्वाच्या शहराचा समावेश आहे. जरी हे चीन साठी खूप फायदेशीर असले तरी भारतावर याचे दुष्परिणाम जाणवतील. काही पर्यावर तज्ञांच्या माहीतीनुसार ब्रम्हपुत्र नदीवरील ६० टक्के पाण्याचा प्रवाह कमी होईल. तज्ञांच्या माहीतीनुसार चीन मधील उपनदीतील ४० टक्के पाण्याचा प्रवाह हा ब्रम्हपुत्रा नदीच्या साहयाने भारतात येतो चीन निर्माण करत असलेल्या प्रकल्पामुळे तो प्रवाह कमी होईल या मुळे भारत आणि चीन संबंधावर नवीन परिणाम जाणवतील व एका प्रकारे भारत हा शातंतेच्या पाणी युध्दाला सामोरे जाण्यास तयार रहावे.

- **जलविद्यूत प्रकल्पाची माहीती.**

ब्रम्हपुत्र नदीवरील जलविद्यूत प्रकल्पा संबंधी बोलायचे झाले तर चीन हा मुख्य दोन जलविद्यूत प्रकल्पाची निर्मिती करतोय ज्यात झांगम आणि लाल्हा या प्रकल्पाचा समावेश आहे आणि इतर लहान पाच प्रकल्पाच्या निर्मीती करतो. यासाठी चीन सरकारने लहासा—बिजींग रेल्वेच्या प्रकल्पातील लोकांना झांगम जलविद्युत प्रकल्पासाठी वापरण्यात आले आणि खजगी चीनी कंपनीला बांधणीचे काम देण्यात आले. **झांगमु** जलविद्युत प्रकल्पासाठी १.५ बिलियन डॉलर खर्च हा पहिल्या युनिट वर झाला आहे हे युनिट २०१० मध्ये तयार झाले. तर आणखी पाच जलविद्युत प्रकल्प युनिट निर्माण करणार आहे. ज्यात झिअचे, डगू, झेक्षो आणि इतर. लहान प्रकल्प आहेत या प्रकल्पा पासून प्रत्येक वर्षी २.५ बिलियन किलोवॉट तासाची विज निर्मिती निर्माण करण्याचे लक्ष आहे. ज्यात झाम जलविद्युत प्रकल्पांचा समावेश आहे.

२०१४ मध्ये चीन ने **लाल्हो** हा जलविद्युत प्रकल्प निर्माण करण्यास सुरवात केला आहे, हा प्रकल्प क्षिआबुकुवर म्हणजे ब्रह्मपूत्राची उपनदी असलेल्या नदीवर निर्माण होणार आहे. त्यासाठी ७४० मिलियन अमेरिकन डॉलर म्हणजे ४.९५ बिलियन युहान खर्च करणार आहे. चीन सरकारद्वारे करण्यात येत असलेल्या खर्चाचे कारण म्हणजे चिन मध्ये निर्माण होत असलेला उर्जा आणि पाणीचा तुटवडा हा या प्रकल्पाच्या निर्मीती मुळे सोडविण्याचा प्रयत्न आहे. जागतिक बँकच्या अहवालानुसार २०३० पर्यंत १.५ बिलीयन लोकसंख्या वाढण्याचा अंदाज आहे. यामुळे उर्जा, अन्न आणि पाणी संबंधीचे मोठे आव्हान चीन पुढे निर्माण होईल.




Source:- "Megadams: Battle on the Brahmaputra", BBC news 20 march 2014.
http://www.bbc.com/news/world-asia-india-26663820

- **भारतावर होणारा परिणाम:**

जागतिक बँकच्या अहवालानुसार भारताची पण २०५० पर्यंत २ बिलीयन लोकसंख्या वाढण्याचा अंदाज आहे. यामुळे उर्जा, अन्न आणि पाणी संबंधीचे मोठे प्रश्न निर्माण होतील पहले कारण आहे निसर्गाद्वारे मिळणाऱ्या पाण्याची व्यवस्था मजबूत नाही आणि दुसरे आहे चीनच्या वाढत्या जलविद्युत प्रकल्पा मुळ निर्माण होत असलेला पाण्याचा प्रश्न.

चीन हा उपनद्यांवर निर्माण करत असलेल्या जलविद्युत प्रकल्पा मुळे किंवा या प्रकल्पाच्या माध्यमातून चीनहा अनेक हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे. जसे लाल्हो प्रकल्प हा अनेक हेतू पुढे ठेऊन तयार केला जातोय ज्यात शेती संदर्भात, विज निर्मिती आणि पूर नियंत्रण करणे अशा भिन्न विचार ज्यामुळे उर्जा, अन्न आणि पाणीची आव्हान सोडविता येते. या प्रकल्पाच्या शेजारी असलेल्या भारताच्या सिक्किम राज्याला मोठा फटका बसेल तसेच भूतान सारख्या अविकसित देशाला पण मोठे नुकसान होईल. दुसरीकडे झांगमु (zangmu)

प्रकल्प किंवा ब्रह्मपूत्रा नदीवर निर्माण होणारे इतर लहान जलविद्युत प्रकल्प आणि चीनद्वारे भविष्यात पाणी अडवण्यात आले तर अरूणाचल प्रदेशातील शेतीचे मोठे नुसार होईल आणि अरूणाचल प्रदेशातील लोकापुढे अन्न आणि पाणीच्या मुलभूत गरजासाठी संघर्ष करावा लागेल जे सुरक्षेच्या बाजूने आव्हान भारता पुढे निर्माण होईल तसेच अरूणाचल प्रदेशातील अस्थिर राहवे असे चीनचे मनसुभे आहेत ज्यामुळे ते आपला दावा सागुशकतात. तसेच भारत निर्माण करत असलेल्या सुबनसिरी जलविद्युत प्रकल्पास याचा फटका बसेल. ज्यामुळे भारत निर्माण करू पाहत असलेला जवळपास ३१,८५७ मेगावॉट विज निर्मितीवर प्रश्न निर्मान होईल आणि पूर्व राज्यांचा विज प्रश्न सोडवीता येणार नाही. तसेच पाणी नसेल तर आसाम मधील चहाच्या बागांचे नुकसाण होईल आणि त्यावर अवलंबून असलेल्या उद्योगावर परिणाम दिसतो.

दुसरे म्हत्वाचे म्हणजे भारत सरकारने आक्ट ईस्ट धोरणाची घोषणा केली मात्र उत्तर पूर्वे कडील राज्यांचा आर्थिक विकास झाला नाही तर पूर्व देशाशी निर्माण करत असलेल्या संबंध मध्ये अढथळा निर्माण होईल कारण उत्तर पूर्वे कडून भारताला सहज मार्ग निर्माण होतो. म्हत्वाचे म्हणजे आक्ट ईस्ट धोरण यशस्वी होणार नाही याची खबरदारी चीन घेण्याचे कारण पूर्व देशात भारत हा चीनला स्पर्धक राहील आणि हे चीनच्या आर्थिक हितास आव्हान देणारे असेल. येथे भारतापुढे उर्जा, अन्न आणि पाणीची आव्हान असेलच पण आर्थिक विकासासाठी काही कटोर निर्णय घेण्याचे आव्हान आहे.

## निष्कर्ष (Conclusion) :-

भारताच्या सुरक्षा चैकटीत जर ब्रह्मपूत्रा नदीवर निर्माण होणारे जलविद्युत प्रकल्पास पाहता चीन हा ब्रह्मपूत्रेवर जवळपास पाच प्रकल्पाची उभारणी करतोय आणि या प्रकल्पाची व्याप्ती ही क्षेत्राच्या गरजे नुसार आहे मात्र जर या धोरणात बदल करुन चीनने ब्रह्मपूत्रा नदीचे पाणी हे अडवीले तर भारतच्या आक्ट ईस्ट धोरणावर आणि पूर्व राज्याचा विकास विरुध्द चीन कडून अघोषीत युध्द आहे आणि याच सुरक्षा चैकटीचा विचार करत भारताने पण काऊटर स्ट्राईक तयार असणे महत्वाचे आहे.

## सुचना (Suggestion) :–

- ब्रम्हपुत्र नदी संबंधीत असलेल्या चीन, भारत, भूतान आणि बांगलादेश यांच्यात पाणि वाटप बाबत करार होणे महत्वाचे आहे.

- दुसरे महत्वाचे म्हणजे भारत आणि चीन यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचे रुपांतर हे लेखी स्वरुपात महत्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथाची सूची:


- Uttam Kumar Sinha, *Riverine Neighbourhood Hydro-Politics in South Asia*, (New Delhi: Pentagon press, 2016).
- Sudha Ramachandran, "Water Wars: China, India and the Great Dam Rush", the Diplomat April 03, 2015. http://thediplomat.com/2015/04/water-wars-china-india-and-the-great-dam-rush/
- Hongzhou Zhang, "Sino-Indian water disputes: the coming water wars?", Wiley Periodicals Volume 03, March/April 2016. http://onlinelibrary.wiley.com/doi/10.1002/wat2.1123/pdf
- Joel Wuthnow, "Water War: This River Could Sink China-India Relations", the National Interest, http://nationalinterest.org/feature/water-war-river-could-sink-china-india-relations-15829?page=show
- Roomana Hukil, "India.China: A Water War over the Brahmaputra?", IPSC http://www.ipcs.org/article/southasia/ indiachinaawaterwaroverthebrahmaputra4415.html
- Sandeep Dixit, "One river, two countries, too many dams", The Hindu 2 April 2013. http://www.thehindu.com/opinion/oped/onerivertwocountriestoomanydams/article4570590.ece
- Brahma Chellaney, "Coming Water Wars", the International Economy, Washington, www.international-economy.com
- Mark Christopher, "Water Wars: The Brahmaputra River and Sino-Indian Relations", Center on Irregular Warfare & Armed Groups (CIWAG) 2013.
- Colonel PK Vasudeva, "Chinese Dams in Tibet and Diversion of Brahmaputra: Implications for India". http://usiofindia.org/Article/Print/?ano=910&pub=Journal&pubno=588
- "Megadams: Battle on the Brahmaputra", BBC news 20 march 2014. http://www.bbc.com/news/world-asia-india-26663820
- Mirza Zulfiqur Rahman, "China and India's Race to Dam the Brahmaputra River Puts the Himalayas at Risk", http://thewire.in/68970/china-and-indias-race-to-dam-the-brahmaputra-river-puts-the-himalayas-at-risk/